# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्रं.  310/2023            दिनांक : 11.08.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**इतवारा** :–दिनांक 09.08.2023 रोजी चे 15.40 ते 16.00 वा. चे दरम्यान, **तांबोली हॉटेल फेमस फंक्शन हॉल देगलुर नाका नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस डिझेल टाकीचे पैसे का दिले नाही म्हणुन शिवीगाळ व थापडबुक्याने मारहाण करून फिर्यादीचे डोक्यात, पाठीवर, खंजरने मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सय्यद इमरान सय्यद उस्मान, वय 45 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक, रा. धनेगाव एकबालनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 251/**2023 कलम** 307, 323, 504, 506, 34 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शेख असद, मो. नं. 9405000786** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 10.08.2023 रोजी चे 04.15 वा. चे सुमारास, **सार्वजनिक सौचालय समोर रोडवर गोकुळनगर नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे डयुटी असल्या कारणाने घरून रेल्वे स्टेशन नांदेडकडे पायी जात असतांना यातील अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करून समोरून मोटार सायकल वरून येवुन फिर्यादीस धक्का देवुन खाली पाडुन चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीच्या हातातील तीन ग्राम सोन्याची अंगठी किंमती 12,000/–रू व हातातील घडयाळ किंमती 1500/–रूपये व नगदी 600/–रूपये असा एकुण 14,100/–रू चा ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी राजीव रंजनकुमार पि. श्रीरामेश्वर यादव, वय 28 वर्षे व्यवसाय नौकरी असीस्टंट लोको पायलट रा. गोरक्षण हनुमान मंदीर जवळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 264/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गित्ते, मो.क्रं. 9923310757** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**उस्माननगर** :– दिनांक 09.08.2023 रोजी चे 22.00 ते दि. 10.08.2023 चे 03.00 वा. चे दरम्यान, **प्रॉपर उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा त्यांचे घराचे हॉटेलमध्ये झोपी गेले असता अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे चॅनल गेटचे कुलूप तोडुन व बेडरूमचे दरवाज्याचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून बेडरूममध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटाचे लॉकर तोडुन कपाटात वेगवेगळे पाकिटता ठेवलेले सोन्याचे दागीने 22.49 ग्रॅम किंमती 1,09,025/–रूपयाचे व नगदी 70,000/–रूपये असा एकुण 1,79,025/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शुभम पि. शिवराम पोटजळे, वय 19 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं. 116/2023 कलम 454, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पल्लेवाड, मो.क्रं. 7350756405** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**नायगांव** :–दिनांक 08.08.2023 रोजी चे 22.00 वा ते 09.08.2023 चे 08.00 चे दरम्यान, **मौ. गडगा शिवार ता. नायगांव जि. नांदेड येथे**, यातील अज्ञात आरोपीने मौ. गडगा शिवारातील शेत गट क्रमांक 12 व 17 मधील उघडयावरील 8 मीटरचे पोल पाडुन नुकसान करून एकुण दहा पोल वरील लघुदाब विद्युत वाहिनी ॲल्युमीनीयमची विद्युत तार तिची एकुण लांबी 2400 मीटर अशी असलेली किंमती 35,000/–रूपयाची चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बळीराम शंकरराव तोठेवाड, वय 31 वर्षे, व्यवसाय सहा. अभियंता शाखा मांजरम रा. मांजरम ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरनं 110/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2040 शेख, मो.क्रं. 8793872040** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**उमरी** :– दिनांक 10.08.2023 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **मच्छी मार्केट उमरी सार्वजनिक रोडवर ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सार्वजनिक रोडवर लोकांकडुन आकडयावर पैसे घेऊन कल्याण ओपण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1700/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/गोविंद भगवान शिंदे, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 216/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2164 भालेराव, मो.क्रं. 7030221125** हे करीत आहेत.

## 6)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**कंधार** :–दिनांक 10.08.2023 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **मयताचे शेतात मौ. लालवाडी शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे विश्वनाथ शिवहार बोंबले, वय 51 वर्षे, व्यवसाय शेती रा. लालवाडी ता. कंधार जि. नांदेड** , हा शेत सर्वे नंबर 13/4 लालवाडी शिवारातील विहिरीवरील मोटार चालु करीत असतांना त्याच्या डाव्या हातास इलेक्ट्रीक शॉक लागल्याने त्यास उपचार कामी स. द. कंधार येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मयत घोषीत केले. वगैरे **खबर देणार संभाजी रामराव बोंबले, वय 53 वर्षे, व्यवसाय शेती रा. लालवाडी ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **33**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो. नं. 9823391570** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड